# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## मोबाईलवर ऑडिओ/व्हिडीओ ऐकत/पाहत असताना हेडफोनचा वापर कराः पी.एम.पी.एम.एल. प्रशासनाकडून प्रवाशांना आवाहन

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील बसेसमध्ये हेडफोन/इयरफोन शिवाय मोबाईलवर ऑडिओ/व्हिडीओ ऐकण्यास, बघण्यास तसेच मोबाईलवर मोठ्या आवाजात बोलण्यास प्रवाशांना मनाई करण्यात आलेली आहे.

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून पुणे व पिंपरी-चिंचवड शहर, शहरांलगतची उपनगरे व ग्रामीण भागात पी.एम.आर.डी.ए. कार्यक्षेत्रामध्ये बससेवा पुरविण्यात येते. सध्या परिवहन महामंडळाकडून ३९६ बस मार्गांवर दररोज सरासरी १७८५ बसेस संचलनात असून सरासरी १३ लाखांपेक्षा अधिक प्रवाशी प्रवास करतात. तथापि काही मार्गांवर प्रवास करणारे प्रवाशी मोबाईलवर हेडफोन/इयरफोन शिवाय ऑडिओ/व्हिडीओ पाहत असताना मोठा आवाज ठेवत असल्यामुळे बसमध्ये इतर प्रवाशांना नाहक त्रास होत असल्याच्या तक्रारी महामंडळाकडे प्राप्त झाल्या आहेत.

प्राप्त झालेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर पी.एम.पी.एम.एल. प्रशासनाकडून बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सूचित करण्यात येते की, मोबाईलवर ऑडिओ/व्हिडीओ ऐकत/पाहत असताना हेडफोनचा वापर करणे आवश्यक आहे. (तथापि कंडक्टर कडून तिकीट घेताना हेडफोनचा वापर करू नये.)

तरी सदरील नियमांचे उल्लंघन केल्यास मुंबई पोलीस अधिनियम कलम ३८/११२ नुसार कारवाई केली जाईल याची नोंद प्रवाशांनी घ्यावी असे आवाहन पी.एम.पी.एम.एल. प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

**sd/-**

चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

दि. ०८/०२/२०२४

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

**sd/-**

कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---